# ।। अथ ब्रम्ह भक्त को अंग ।।
# मारवाडी+ मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:- रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

अथ ब्रम्ह भक्त को अंग लिखंते ।।

।। श्लोक ।।

**जत्तीस मत्तो किरिया बिचारी ।। बहु धाम परसे जिग सुध धारी ।।**
**सेवास पूजा सुरगुणो स ध्यावे ।। बिन ब्रम्ह भगती मोखोन जावे ।।१।।**

कड्क जतीचे मत धारण करुन जतीची क्रिया साधली,सर्व अड्डुसष्ट धाम केले,सर्व यज्ञ कोणती अशुध्दी न ठेवता केले,कष्ट देऊन देऊन सगुण देवतांची सेवा,पूजा आणि आराधना केली तरी ही जीव मोक्षास जाणार नाही.मोक्षाला जीव सतस्वरुप ब्रम्ह भक्ती केल्यावरच जाईल. ।।१।।

**निगमो स बाणी बहु बिध बोले ।। के मुख असी तिहुँ लोक तोले ।।**
**अरथांस ग्रंथा वार न पारा ।। बिना ब्रम्ह भगती मोखो न द्वारा ।।२।।**

सर्व प्रकारच्या वेदांची वाणी कंठस्थ बोलतो.तिन्ही लोक एकाच साखेत तोलले जातील अशी मुखाने वाणी बोलतो.ग्रंथ आणि त्या ग्रंथांचा भेद पार येत नाही इतके जाणून घेतले राहते,तरी ही जीव मोक्षाला जाणार नाही.मोक्षाच्या दरवाज्यात सतस्वरुप ब्रम्ह भक्ती शिवाय जाणार नाही. ।।२।।

**मत्तोस जत्तो भिन पंथ पीया ।। पवन ज खेंची गिर वास लीया ।।**
**वासो ज रोजा मून संभावे ।। बिन ब्रम्ह भगती मोखो न जावे ।।३।।**

मत आणि जत वेगवेगळ्या पंथाच्या ज्ञानाने धारण केले.श्वासाला ओढून भृगुटी गिरवरावर चढविले.सर्व वास,उपवास व रोजे केले.मौन धारण केले तरी ही जीव मोक्षाला जाणार नाही.मोक्षाला जीव सतस्वरुप ब्रम्ह भक्ती केल्यावरच जाईल. ।।३।।

**क्रोतो ज कासी झाँफो न कंवळा ।। अग्निन ठाढो उलटा न संवळा ।।**
**नव लीस अंतो जळ पांख धोई ।। बिन ब्रम्ह भगती मोखो न होई ।।४।।**

काशीत जाऊन करवत चालवतो,झाप घेतो.महादेवाला आपले शिर चढवून देतो.अग्नीत उभा राहतो,हिमालयात गळून जातो,उलटा लटकतो,कड्क आसन मारुन बसतो,नौली क्रिया करतो आणि आतडे पाण्याने धुतो ****तरी ही जीवाचा मोक्ष होणार नाही. जीवाचा मोक्ष सतस्वरुप ब्रम्हभक्ती केल्यावरच होईल. ।।४।।

**अन तज नीरो काया ज पाडे ।। शिव पास पूजा कंवळो ज चाडे ।।**
**बनवास मेरे धुणि चहुँ फेरा ।। बिन ब्रम्ह भगती मोखो न डेरा ।।५।।**

अन्न,पाणी त्यागून काया त्यागून देईल.महादेवाची पूजा करुन महादेवासमोर आपले शिर कापून चढवून देईल.वनात जाऊन राहिल आणि चारी बाजूनी चौऱ्यांशी प्रकारची धुनी लावून मध्यभागी बसून तपश्चर्या करेल तरी ही जीवाचा मोक्ष होणार नाही.जीवाचा मोक्ष सतस्वरुप ब्रम्हभक्ती केल्यावरच होईल. ।।५।।

फळ फूल फराळ पै घ्रित सोड़े ।। बहु बिध आसन काया जुं मोडे ।।
सिर केस अंगा फिर खाख ल्यावे ।। बिन ब्रम्ह भक्ति मोखो न पावे ।।६।।

फळ-फुलाचा फराळ करेल,दुध आणि तुप खाईल बाकी सर्व अन्न त्यागून देईल आणि सर्व आसन करुन शरीराला मोडेल.मस्तक,केस व शरीरावर राख लावेल तरी ही जीव मोक्षाला जाणार नाही.मोक्षाला जीव सतस्वरुप ब्रम्ह भक्ती केल्यावरच जाईल. ।।६।।

रिधोस सिधो बहुं पास होई ।। देह दिष्ट पलटी सब सिष्ट जोई ।।
भूतोस प्रेतो देवोस ल्यावे ।। बिन ब्रम्ह भक्ति मोखो न जावे ।।७।।

सर्व रिध्दी आणि सिध्दी जवळ आहे.देह दृष्टी पसरविताच सर्व सृष्टी पाहून घेतो आणि मंत्रांच्या बळाने भूत,प्रेत आणि देवांना बोलवून घेतो तरी ही जीव मोक्षाला जात नाही.मोक्षाला जीव सतस्वरुप ब्रम्हभक्ती केल्यावरच जाईल. ।।७।।

अेवास मेहरी सेजो स त्यागे ।। बहु खूब बैठक अेनिस जागे ।।
कर ग्रास आहारी आसान कोई ।। बिन ब्रम्ह भक्ति मोखो न होई ।।८।।

आपल्या महालाचा,पत्नीचा आणि आरामदायी अंथरुणाचा त्याग करतो आणि खिळ्यांच्या आसनावर बसतो आणि झोपतो,खिळे ठोकलेल्या पाटावर चांगली बैठक मारतो.रात्र-दिवस जागे राहतो,कधी ही झोपत नाही आणि आपल्या तळहातावर जितका येऊ शकतो तितकाच घास घेऊन आहार करतो आणि याच्या पेक्षा जास्त भोजन करीत नाही. कोणत्या ताटात किंवा भांड्यात न खाता हातावरच भोजन करतो तरी ही जीवाचा मोक्ष होणार नाही. जीवाचा मोक्ष सतस्वरुप ब्रम्ह भक्ती केल्यावरच होईल. ।।८।।

लछो स गछो बहुं सरूप धारी ।। गुफास वासं गेहे पाँच मारी ।।
सुखोस दुखो से सोस जाणी ।। बिन ब्रम्ह भक्ति मोखो न प्राणी ।।९।।

चांगले चांगले लक्षण धारण करतो,खुपसे पुष्कळ रुप धारण करतो,गुफेत जाऊन राहतो आणि पाची इंद्रियांना मारतो.सुख आणि दु:ख सर्व सहन करतो तरी ही प्राण्याचा मोक्ष होत नाही.प्राण्याचा मोक्ष सतस्वरुप ब्रम्ह भक्ती केल्यावरच होईल. ।।९।।

देह तेल सिंचे अग्निज बाळे ।। सब तन कापी प्रान प्रजाळे ।।
बहु हट हुन्नर करिये स कोई ।। बिन ब्रम्ह भक्ति मोखो न होई ।।१०।।

शरीरावर तेल शिंपडून अग्नीत जाळतो.आपले सर्व शरीर कापून प्राण त्यागतो.पुष्कळ प्रकारचे हट्ट आणि हुन्नर करतो तरी ही जीवाचा मोक्ष होणार नाही.जीवाचा मोक्ष सतस्वरुप ब्रम्हभक्ती केल्यावरच होईल. ।।१०।।

गज बाज फोजां बहु राज होई ।। दिन भाण दिवता आड न कोई ।।
अेवास गिगनो वाँ जाय लागा ।। बिन ब्रम्ह भक्ति धकार जागा ।।११।।

जवळ अनेक हत्तींचे दल आहेत.पुष्कळशे घोडे आहेत.पुष्कळशी फौज जवळ आहे आणि

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

सूर्य उदयापासून अस्त एकाच वेळी होतो तेथपर्यंत राज्य आहे.जसे दिवसा सूर्य दिपायमान होतो आणि त्या सूर्याच्या आड्वे येऊन कोणी अटकवित नाही त्याच तऱ्हेने कोणी आड्वे येऊन अटकवू शकत नाही आणि गगनासारखे उंचावर राहण्याचे घर आहे.असे घर राहण्याकरीता राहिले तरी ही सतस्वरुप ब्रम्ह भक्तीच्याशिवाय त्या राहण्याच्या उंच जागेला,राज्य विस्तारला,फौजेला,त्या घोड्यांना,हत्तींना या सर्वांना धिक्कार आहे.।११।।

मिण सेत माणक द्रबोस खाणी ।। तिहुँ लोक धुजे पलटे न बाणी ।।
ईसा सदेह जते जोस पाया ।। बिना ब्रम्ह भक्ति ध्रकार भाया ।।१२।।

मण्यां सोबत माणिकासारख्या पुष्कळश्या द्रव्यांची खाण आहे.तिन्ही लोक ज्याच्याने कापतात आणि त्याचे सांगितलेले वचन कोणी पालटतही नाही,जे म्हणेल त्याच्या–नुसार सर्व लोक करतील,सांगितल्यानुसार करण्यास कोणी मनाई करीत नाही असा देह आणि तेज ज्याला मिळाले आहे परंतु सतस्वरुप ब्रम्ह भक्तीच्या शिवाय त्याला धिक्कार आहे.।।१२।।

कळ धेन चित्रो किम्योस पारा ।। देवोस दाणुं सब पेक हारा ।।
रिण जीत सूरा मुड़ता न कोई ।। बिन ब्रम्ह भक्ति ध्रकार होई ।।१३।।

कल्पवृक्ष,कामधेनू,चिंतामणी,चित्रावली आणि तऱ्हेतऱ्हेच्या किमया अपार आहेत.सर्व देव आणि दानव सर्व हारुन गेले आहे,असा कोणा कडूनही न पलटवता येणारा शूरवीर रणजीत आहे,असा ही जरी राहिला तरी ही सतस्वरुप ब्रम्ह भक्तीच्या शिवाय त्याला धिक्कार आहे.।।१३।।

मायास काया अरबास संखो ।। बहु ख्वास पासं ढुळ सीस पंखो ।।
चित्त चेत चेरी चावेस होई ।। बिन ब्रम्ह भक्ति ध्रकार सोई ।।१४।।

शरीर सुंदर,निरोगी व बलशाली आहे.माया अरबों शंख मध्ये आहे.सेवा करणारे सेवक खुप आहेत.डोक्यावर पंखा हलवणारे अनेक आहेत.चित्तात भावणाऱ्या दास्या आणि स्त्रीया खूप आहेत तरी ही सतस्वरुप ब्रम्हभक्तीशिवाय त्याला धिक्कार आहे. ।।१४।।

रागे न पागे न्यावो न निरणा ।। हे गज अंबा प्रखेस फिरणा ।।
सुणिये स सीखे तत्त काळ लीया । बिन ब्रम्ह भक्ति ध्रकार जीया ।।१५।।

सर्व राग रागिण्यांमध्ये प्रविण आहे.पायांचे निशाण ओळखण्यात प्रविण आहे,न्यायाने निर्णय करण्यात प्रविण आहे.हत्ती,घोड्यासोबत देश,परदेश(प्रखेस)फिरतो.श्लोक,पद ऐकताच तत्काळ शिकून घेतो,असा असला तरी ही सतस्वरुप ब्रम्ह भक्ती शिवाय त्याच्या जिवंत राहण्याला धिक्कार आहे. ।।१५।।

सिधोस पीरो अवतार होई ।। जुग थिर देहि खिरता न कोई ।।
सब शिष्ट भांजी थापे स न्यारी ।। बिन ब्रम्ह भक्ति ध्रकार सारी ।।१६।।

सिध्दाई प्रगट करणारा सिध्द होऊन गेला.करामातने पीर तसेच अवतार बनून गेला. जगात आपला देह अमर करुन घेतो.पूर्ण सृष्टीला क्षणात भंग करुन जसेच्या तसे स्थापून देतो,असा पराक्रमी ही राहिला तरी ही सतस्वरुप ब्रम्ह भक्तीच्या शिवाय त्याचा पराक्रमाला धिक्कार आहे. ।।१६।।

**आताळ पाताळ तिहुँ लोक सुजे ।। सुभ जाण असुभा बिद बेत बुझे ।।**
**दत्तोस करणी कुंभ्यो स काई ।। बिन ब्रम्ह भक्ति धकार भाई ।।१७।।**

आताळ,पाताळापासून स्वर्गादिकापर्यंत तिन्ही लोक सुचतात.शुभ तसेच अशुभ विध्यां–मध्ये जाणकार आहे या कारणाने सर्व तऱ्हेच्या विध्या व सर्व तऱ्हेच्या बेत(विचार) त्याच्याकडे विचारतात.धन तसेच चांगल्या करण्यांची काही कमी नाही तरी ही सतस्वरुप ब्रम्ह भक्तीच्या शिवाय धिक्कार त्याला आहे. ।।१७।।

**आकार जप्या बहुं बिध सेवा ।। धन सुत राजं तुष्टोस देवा ।।**
**सुर लोक वासा जुग च्यार दीया । फिर घेर गधी जढ जीव कीया ।।१८।।**

आकारी देवी–देवता,अवतारांचा जप व सेवा खूप करतो तेव्हा तो देव प्रसन्न होऊन धन,पुत्र,तसेच राज्य देतो आणि चार युगांचे त्रेचाळीस लाख,वीस हजार वर्षांपर्यंत देवलोकात राहायला निवास प्राप्त करतो मग नंतर त्याला गाढव किंवा जड जीव बनवून देतात. ।।१८।।

**रोजास बरतो वासोस धामा ।। गेहे प्राण रूपं उत्तमो स जामा ।।**
**तप तेज इंद्रि ग्रेहे त्याग कीया ।। सुरलोक भूलोक अेबास दीया ।।१९।।**

रोजे ठेवतो,व्रत उपवास करतो,सर्व तिर्थ करतो आणि हे शरीर सुटल्यानंतर पुढच्या जन्मात उत्तम रुपवान काया प्राप्त करतो.घर गृहस्थी त्यागून तप तेजाने इंद्रिय मारतो. सुरलोक तसेच चौदा भवनातील भुवरलोकात वास मिळतो. ।।१९।।

**किरिया स करणी देवोस भाखे ।। गुफा ज जापे बैकुंट राखे ।।**
**सब सोझ करणी फळ रूप पावे । बिन ब्रम्ह भक्ति मोखो न जावे ।।२०।।**

चांगल्या क्रिया करणी करतो,देवांची आराधना करतो,गुफेत राहून जप करतो आणि करण्यांच्या फळांच्या प्रमाणानुसार वैकुंठ मिळतो तरीही जीव मोक्षाला जाणार नाही, मोक्षाला जीव सतस्वरुप ब्रम्हभक्ती केल्यावरच जाईल. ।।२०।।

**ध्रबोस गेला गत गाय खेती ।। गोळीस तीरो तिल तत्त मेथी ।।**
**तुरणी स पासा बहु हीर होई ।। बिन भेद भक्ति मोखो न लोई ।।२१।।**

धन प्राप्त करण्याचे अनेक साधन जाणणारा,गाय व शेती पालनाची गती जाणणारा,तसेच तीर चालविण्यात प्रविण आहे.गोळी तसेच तीरने तिळ,मेथी दाण्यासारखी बारीक वस्तु उड्वून देतो.जवळ स्त्रिया व हीरे खूप आहेत परंतु सतस्वरुप ब्रम्हभक्तीच्या भेदाशिवाय

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

लोकांचा मोक्ष होणार नाही. ।।२१।।

**सर नीर बंधो तर फूल दीया ।। बहु रूप गेली बिन जोतडीया ।।**
**मिष्टो न नवजे रेणो न चंदा ।। बिन भेद भक्ति सुखो न संदा ।।२२।।**

सरोवराला बांध बांधतो आणि वृक्ष आणि फुलांची भरपूर शेती करतो. ।।२२।।

तालाब के पानी को बांधनेवाला हो,बिना वृक्ष और फूल के कई वृक्ष और फल बनानेवाला हो,अनेक रुप धारण करनेवाला हो,अनेक रास्ता बता देनेवाला हो,बिना ज्योति प्रकाश करनेवाला हो,बिना मीठे के मिठाई बना देनेवाला हो,रात्रि में चंद्रमा के बिना प्रकाश दिखानेवाला हो,लेकिन बिना ब्रम्हा की भक्ति के अक्षय सुख नहीं मिलता हो। ।।२२।।

**सुधो न बुधो सुच्चो न काया ।। बिन भेद बकता ।। बहु ग्यान लाया ।।**
**खर स्याल कवा स्वानो पुकारे । बिन भेद बक ग्यान यूँ झख मारे ।।२३।।**

काही शुध्दी नाही,काही बुध्दी नाही,काया विषय विकारांनी अपवित्र आहे.कोणता भेद नाही आणि तो ब्रम्हच्या नावावर ज्ञान आणून आणून बकत आहे आणि गाढव रेंकल्यावर, कोल्हे,कावळे आणि कुत्रे भुंकतात,गोंधळ करतात.अशाप्रकारे ब्रम्हज्ञानाच्या नावावर निच कर्म प्रकृतीचे खोटे ब्रम्हज्ञान सांगून लोकांना बहकवतात. ।।२३।।

**देवो न नीरं मीदो न कूँपे ।। नहिं प्राण पिंडे तक्रोन चूंपे ।।**
**वा सन कण भव पो भूस केसे ।। बिन ब्रम्ह भक्ति गिनानो स असे ।।२४।।**

देव ही नाही आणि पाणी ही नाही,नदी ही नाही आणि विहीर ही नाही आणि पिंडात प्राण नाही आणि ब्रम्हभक्ती शिवाय सर्व ज्ञान असेच आहे. ।।२४।।

**हे रूज नगरो गेहे मांड दीया ।। ध्रबोज जागा अेहे नाण कीया ।।**
**यूँ भेव का स गुर सिष खोले ।। तब जोस आतम मुखराम बोले ।।२५।।**

ज्या तऱ्हेने चांगल्या नगरात(   )घर शोधून राहतो तसेच त्या जागी धन आहे त्याचे निशाण करुन देतो असेच गुरु शिष्याला भेद खोलून सांगतात तेंव्हा आत्म्यात जोर येऊन मुखाने रामनाम बोलू लागला. ।।२५।।

**घाटा ज समदो गढ नींव काची ।। केहे राग भेदं गहे चीज आची ।।**
**यूँ जाण जोगी तब ब्रम्ह पावे ।। के सुख मोखो सो हंस जावे ।।२६।।**

जसे समुद्रात समुद्राच्या किनारी(मुंबई),तीर्थस्थानावर नदीच्या किनारी जे घाट असतात, त्यात पाया बनवितात,पाया कच्चा राहिला तर तो वाहून जातो.जो रागाचा जाणकार, रागाचा गुण प्रगट करुवून देतो व राग बरोबर किंवा चुकीचा आहे याचा फरक सांगून देतो असेच योगी जेव्हा ब्रम्हला जाणेल तेव्हा ब्रम्ह मिळेल.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,तेंव्हा हा हंस मोक्षास जाईल. ।।२६।।

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**खिम्या गिनानो जरणास नितो ।। मुख साच बोली सब लछ जीतो ।।**
**बैकुंट वासा सुख चेन पावे ।। बिन तत्त चीन्या मोखो न जावे ।।२७।।**

क्षमा,ज्ञान,जरणा(सहनशीलता)नित्य ठेवतो.मुखाने सत्य बोलतो आणि सर्व लक्षण जिंकून जातो त्याला वैकुंठाचा वास मिळतो आणि वैकुंठात सुख तसेच चैन प्राप्त करतो परंतु तत्त(ब्रम्ह)ओळखू शकत नाही तो पर्यंत मोक्षाला जात नाही. ।।२७।।

**सब लछ जरणा किर खोज बारी ।। मथ गिनांन किमत रा भेद सारी ।।**
**कण नाम पावे अेहे रात ध्यावे ।। के सुख मोखो या बिध पावे ।।२८।।**

सर्व चांगल्या लक्षणांना तसेच सहनशीलतेला शोधून धारण करा.ज्ञानाची किंमत समजून, मनन करत रस्त्याचा भेदाची माहिती करा.कण नाम म्हणजे सतशब्दाची प्राप्ती करुन रात्रं–दिवस ध्यान करा.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,या विधीने मोक्षाची प्राप्ती होते.।।२८।।     ।। इति ब्रम्ह भक्ति को अंग संपूरण ।।